**गडचिरोली जिल्ह्यामध्ये वन्य रेशीम (टसर) व तुती रेशीम उद्योगाच्या विकासासाठी रेशीम संचालनालय, नागपूर व बाइफ (BAIF) या संस्थेमार्फत विशेष प्रकल्प राबविणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**शासन निर्णय क्रमांक:-सपववि-४००१२/८/२०२५-DESKSERICULTURE-CMTD**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक: १३ मे, २०२६.

**वाचा:-**

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.प्रावियो-२०१८/प्र.क्र. ९०/रेशीम कक्ष, दिनांक ९ फेब्रुवारी, २०२४.

२) संचालक (रेशीम) यांचे पत्र क्रमांक जा.क्र.रेशीम/कार्या-७/टसर/बायफ प्रकल्प/MoU/२०२६/२२२, दि.४ मार्च २०२६.

**प्रस्तावना:**

गडचिरोली जिल्हा हा विस्तीर्ण जंगलक्षेत्र, समृद्ध नैसर्गिक जैवविविधता तसेच मोठ्या प्रमाणातील आदिवासी लोकसंख्या यांमुळे विशेष वैशिष्ट्यपूर्ण आहे. जिल्ह्यात ऐन व अर्जुन या टसर रेशीम कीटकांच्या खाद्य वृक्षांची मुबलक उपलब्धता असून, टसर रेशीम कीटक पालनासाठी अत्यंत अनुकूल भौगोलिक व पर्यावरणीय परिस्थिती येथे आढळते. त्यामुळे या क्षेत्रात टसर रेशीम उद्योगाच्या माध्यमातून शाश्वत उपजीविका निर्माण करण्याची मोठी क्षमता उपलब्ध आहे.

बाइफ (BAIF) संस्थेने सन २०१६ ते २०२० या कालावधीत गडचिरोली जिल्ह्यात महिला सशक्तीकरण परियोजना (MKSP) अंतर्गत टसर रेशीम विकासाचे प्रकल्प यशस्वीपणे राबविले आहेत. सदर प्रकल्प भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालय (MoRD) तसेच वस्त्रोद्योग मंत्रालयांतर्गत केंद्रीय रेशीम मंडळ (CSB) यांच्या अनुदान सहाय्याने कार्यान्वित करण्यात आला होता. या कालावधीत संस्थेने टसर रेशीम कीटक पालन क्षेत्रात स्थानिक शेतकरी, विशेषतः अनुसूचित जमाती व महिला गटांचे कौशल्यवर्धन करून त्यांना शाश्वत उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर, टसर रेशीम विकास प्रकल्प राबविण्याबाबतचा प्रस्ताव बाइफ (BAIF) संस्थेमार्फत रेशीम संचालनालयास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने रेशीम संचालनालयाने आवश्यक त्या शिफारसींसह प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. या प्रकल्पाद्वारे गडचिरोली जिल्ह्यातील सुमारे २२७० हून अधिक टसर शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाच्या संधी उपलब्ध करून देणे, तसेच अनुसूचित जमाती समुदाय व महिलांचे आर्थिक व सामाजिक सशक्तीकरण करणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे.

प्रस्तावित प्रकल्पांतर्गत खाजगी टसर अंडीपुंज निर्मिती केंद्रांची स्थापना, बीज कोष उत्पादन, व्यवसायिक कोष उत्पादन तसेच कोषोत्तर मूल्यवर्धन साखळी विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन व क्षमता विकास कार्यक्रम राबविण्यात येणार असून संस्थेच्या प्रशिक्षित मनुष्यबळाचा प्रभावी वापर करण्यात येईल. सबब, गडचिरोली जिल्ह्यात टसर रेशीम विकासास चालना देण्यासाठी तसेच ग्रामीण व आदिवासी भागात शाश्वत रोजगार निर्मितीस प्रोत्साहन

देण्यासाठी “टसर रेशीम विकास प्रकल्प (२०२६-२०२९)” राबविण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

गडचिरोली जिल्ह्यात टसर रेशीम विकासास चालना देण्यासाठी तसेच आदिवासी व ग्रामीण भागात शाश्वत रोजगार निर्मिती करण्याच्या दृष्टीने “टसर रेशीम विकास प्रकल्प (२०२६-२०२९)” राबविण्यास शासन पुढील अटी व शर्तींसह शासनाची मान्यता देत आहे :

**१) प्रकल्प क्षेत्र व लाभार्थी :**

सदर प्रकल्प गडचिरोली जिल्ह्यातील इटापल्ली, भामरागड, अहेरी, कुरखेडा, आरमोरी, पेरिमिली, सिरोंचा व मुलचेरा या ८ तालुक्यांमध्ये राबविण्यात येईल. प्रकल्पांतर्गत एकूण २२७० लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.अनुसूचित जमाती, महिला व स्वयंसहायता गटांना प्राधान्य देण्यात येईल.

**२) प्रकल्प घटक व भौतिक उद्दिष्टे :**

**२.१ मुलभूत बीज कोष उत्पादन :**

- ३ वर्षांत एकूण १८० बीज कोष उत्पादक विकसित करण्यात येतील (प्रतीवर्ष ६०).
- आवश्यक साहित्य व वृक्ष संवर्धनासाठी सहाय्य देण्यात येईल.
- तिसऱ्या वर्षाअखेर २.५० ते ३.०० लाख अंडीपुंज निर्मिती क्षमता निर्माण होईल.

**२.२ व्यावसायिक कोष उत्पादन :**

- पहिल्या वर्षी ५०० व पुढील दोन वर्षांत प्रत्येकी ७०० लाभार्थ्यांना सहाय्य देण्यात येईल.
- एकूण १९०० व्यवसायिक कोष उत्पादक तयार करण्यात येतील.

**२.३ खाजगी अंडीपुंज निर्मिती केंद्रे :**

- एकूण ४० केंद्रांची स्थापना करण्यात येईल.
- पहिल्या वर्षी १० व पुढील दोन वर्षांत प्रत्येकी १५ केंद्रे उभारण्यात येतील.
- प्रति केंद्र सुमारे ५००० अंडीपुंज निर्मिती क्षमता विकसित करण्यात येईल.

**२.४ टसर रेशीम धागा निर्मिती समूह :**

- ३ वर्षांत ३ धागा निर्मिती समूह स्थापन करण्यात येतील.
- स्थानिक महिला बचत गटांना रोजगार उपलब्ध करून देण्यात येईल.

**२.५ मनुष्यबळ (रेशीम दूत) :**

- CSR निधीमार्फत १०० रेशीम दूतांची टप्प्याटप्प्याने नियुक्ती करण्यात येईल.
- रेशीम संचालनालयामार्फत ५ रेअरिंग ऑपरेटीव्ह नियुक्ती करण्यात येईल.

**२.६ प्रशिक्षण व क्षमता विकास :**

- १८० बीज कोष उत्पादक, १९०० व्यवसायिक उत्पादक, ४० अंडीपुंज धारक व १५० धागा निर्मिती प्रशिक्षाणार्थींना प्रशिक्षण देण्यात येईल.
- अभ्यास दौरे व प्रात्यक्षिके आयोजित करण्यात येतील.
- प्रशिक्षण रेशीम संचालनालयामार्फत देण्यात येईल.

**३) आर्थिक आराखडा :**

सदर प्रकल्पाच्या ०३ वर्षाच्या कालावधीकरिता ₹ १३३५.०० लाख इतका खर्च अपेक्षित असून त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे दिला आहे :-

| अ.क्र. | निधी स्रोत | एकूण रक्कम (रु.लाखात) |
|---|---|---|
| १ | जिल्हा वार्षिक योजना अथवा जिल्हा खणिकर्म निधी | ८०.४२ |
| २ | केंद्रीय रेशीम मंडळ (सिल्क समग्र योजना) व राज्य योजना | ५२२.९६२ |
| ३ | सी.एस.आर निधी | ७३१.६६८ |
| | **एकूण रक्कम रुपये** | **१३३५.०** |

**४) निधी उपलब्धता:**

सदर प्रकल्पासाठी निधी हा "सिल्क समग्र २.०" योजनेंतर्गत केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा, बाइफ (BIAF) मार्फत CSR निधीमधून उपलब्ध करण्यात येईल. त्याचबरोबर प्रथम वर्षासाठी ₹८०.४२ लाख निधी जिल्हा नियोजन व विकास समिती, गडचिरोली यांचेकडून उपलब्ध करून देण्यात येईल.

**५) अपेक्षित परिणाम :**

- २७० लाभार्थ्यांना टसर रेशीम व्यवसायाच्या माध्यमातून शाश्वत व नियमित उपजीविकेच्या संधी उपलब्ध होतील.
- दरवर्षी सुमारे २.५० ते ३.०० लाख अंडीपुंज निर्मिती क्षमता निर्माण होऊन उत्पादनात सातत्य व स्थैर्य येईल.
- बीज कोष उत्पादनात लक्षणीय वाढ होऊन टसर रेशीम मूल्यसाखळीचा सर्वांगीण विकास साधला जाईल.
- महिला व स्वयंसहायता गटांचे (SHG) आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण होऊन त्यांचा उत्पन्नवाढीत सहभाग वाढेल.
- गडचिरोली जिल्ह्यात टसर रेशीम उत्पादनासाठी आदर्श क्लस्टर उभारणी होऊन संघटित विकासास चालना मिळेल.
- वनसंपत्तीचा शाश्वत व नियोजित वापर होऊन पर्यावरण संरक्षणास तसेच वनीकरणास प्रोत्साहन मिळेल.
- स्थानिक स्तरावर रोजगार निर्मिती होऊन लाभार्थ्यांच्या जीवनमानात सुधारणा व आर्थिक उन्नती साध्य होईल.

**६) अंमलबजावणी, सामंजस्य करारनामा (MoU) व देखरेख व्यवस्था ::**

सदर "टसर रेशीम विकास प्रकल्प (२०२६-२०२९)" ची अंमलबजावणी रेशीम संचालनालय, नागपूर व बाइफ (BAIF) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येईल. प्रकल्पाची प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी रेशीम संचालनालय, नागपूर व बाइफ (BAIF) संस्था यांच्यामध्ये सामंजस्य करारनामा (MoU) करण्यात येणार आहे. सदर करारनाम्यामध्ये प्रकल्पातील विविध घटकांची अंमलबजावणी, जबाबदाऱ्या, निधी वापर, मनुष्यबळ नियुक्ती, तांत्रिक सहाय्य, प्रशिक्षण कार्यक्रम, अहवाल सादरीकरण तसेच समन्वय याबाबत स्पष्ट तरतुदी करण्यात येणार आहेत.

सामंजस्य करारनाम्यानुसार रेशीम संचालनालय हे प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक व तांत्रिक मार्गदर्शक संस्था म्हणून कार्य करेल, तर बाएफ संस्था ही क्षेत्रीय स्तरावर प्रकल्पाची अंमलबजावणी, लाभार्थी निवड, प्रशिक्षण आयोजन, तसेच प्रत्यक्ष कामकाजाची जबाबदारी पार पाडतील.

प्रकल्पाच्या प्रभावी देखरेख व नियंत्रणासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली देखरेख समिती स्थापन करण्यात येईल. सदर समितीमार्फत प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात येईल व

आवश्यक त्या सूचना देण्यात येतील. तसेच, प्रकल्पाच्या प्रगतीबाबत त्रैमासिक अहवाल रेशीम संचालनालयामार्फत शासनास सादर करणे बंधनकारक राहील. याशिवाय, आवश्यकतेनुसार प्रकल्पाचे मूल्यांकन करून सुधारणा उपाययोजना राबविण्यात येतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळाबर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१३१८०७२७४१०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PAWAR TUSHAR PITAMBAR
Date: 2026.05.13 18:08:38 +05'30'

**( डॉ.तुषार पवार )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१) मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव
२) प्रधान महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
३) महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
४) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर.
६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
७) सहायक संचालक, प्रादेशिक रेशीम कार्यालय, नागपूर/पुणे/अमरावती/छ.संभाजीनगर.
८) सर्व जिल्हा रेशीम अधिकारी श्रेणी-१/श्रेणी-२.
९) निवड नस्ती (रेशीम कक्ष).